तरुण भारत | शुक्रवार, २३ डिसेंबर २०२२

# आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे!

## कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय सावंत यांचे प्रतिपादन : दोडामार्ग हळबे महाविद्यालयात चर्चासत्र

वार्ताहर
दोडामार्ग

बदलते हवामान हा प्रश्न आताच निर्माण झालेला नसून` हवामान बदल काही कालावधीनंतर होत आलेला आहे. हवामान बदलाचा शेती उत्पादनावर विपरित परिणाम होताना दिसून येत आहे. असे असले तरी या बदलाला सामोरे जाण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपले उत्पादन वाढविणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत यांनी केले.

येथील हळबे महाविद्यालयात आयोजित केलेल्या महाविद्यालयाच्या , अर्थशास्त्र विभागाच्यावतीने आयसीएसएसआर मुंबई पुरस्कृत 'हवामान बदल आणि भारतीय शेती' या विषयावर आंतरविद्या दोन दिवसीय चर्चासत्र झाले. त्यावेळी ते बोलत होते. चर्चासत्राची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर डॉ. बाळासाहेब कोकण कृषी विद्यापीठाचे संशोधक संचालक डॉ. संजय भावे, नवनिर्माण शिक्षण संस्था रत्नागिरीचे संचालक सूर्यकांत परमेकर, आत्मा समितीचे तालुकाध्यक्ष प्रेमानंद देसाई, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य विवेकानंद नाईक, प्रा. राजेंद्र केरकर, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, प्रा. डॉ. एस. यू. दरेकर उपस्थित होते.




**दोडामार्ग : हळबे महाविद्यालयातील चर्चासत्राचे दीपप्रज्वलन करताना कुलगुरू डॉ. संजय सावंत, संशोधक संचालक डॉ. संजय भावे, सोबत विवेकानंद नाईक, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत व अन्य.**
समीर ठाकुर

कुलगुरू डॉ. सावंत बोलताना पुढे म्हणाले, शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी विद्यापीठ व देशपातळीवर संशोधन होत आहे. त्याचा सर्व शेतकऱ्यांनी लाभ घेणे गरजेचे आहे. कोकण प्रदेश हा सद्यस्थितीत हवामान बदलापासून काही प्रमाणात सुरक्षित असला तरी भविष्यात ही समस्या वाढण्याचा धोका नाकारता येणार नाही. त्यासाठी शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन वाढविणे गरजेचे आहे, असे उद्गार त्यांनी काढले.

### शेतीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणे गरजेचे

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. संजय भावे यांनी सांगितले की आपला शेतीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे. शेतीला जर आपण इतर उद्योगाची जोड दिल्यास व पूर्णवेळ शेती केल्यास त्याचा फायदा निश्चितच शेतकऱ्यांना होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. महाविद्यालय विकास समितीचे सदस्य विवेकानंद नाईक यांनी महाविद्यालयात होणाऱ्या सांस्कृतिक विविध उपक्रमासाठी स्टेज तयार करून दिल्याबद्दल त्यांचा कुलगुरूंच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. एस. यू. दरेकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. संजय खडपकर, तर आभार डॉ. सोपान जाधव यांनी मानले. या समारंभासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोलीचे संशोधक सहायक डॉ. कस्तुरे, विविध महाविद्यालयाचे प्रतिनिधी, तालुका कृषी अधिकारी प्रमोद बनकर, महाविद्यालायातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.